# इंद्रायणी को-ऑप. बँक लि. पिंपरी

## * २१व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना *

### (फक्त सभासदांसाठी)

इंद्रायणी को ऑप. बँक लि. पिंपरी या बँकेच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविणेत येते की, बँकेची २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.१८ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता बी. टी. आडवाणी धर्मशाळा, पिंपरी या ठिकाणी बँकेचे मा. अध्यक्ष श्री. अरुण रामदास शिनकर (वाणी) यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करून निर्णय घेण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.

### * सभेपुढील विषय *

१) मागील दिनांक ३०.०९.२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) मा. संचालक मंडळाचा अहवाल, वैधानिक लेखापरीक्षक यांनी प्रमाणित केलेल्या ३१.०३.२०२२ या वर्षाअखेरचा ताळेबंद व नफा तोटा पत्रकाचा विचार करून ते स्विकृत करणे.

३) आर्थिक वर्ष सन २०२१ - २२ या वर्षामध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकास संचालक मंडळाच्या शिफारशीनुसार मान्यता देणे.

४) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२१-२२ च्या नफा विभागणीस मान्यता देणे.

५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(२) नुसार संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.

६) वैधानिक लेखापरीक्षक यांच्याकडून आलेल्या सन २०२१-२२ या वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे.

७) वैधानिक लेखापरीक्षक यांच्याकडून आलेल्या सन २०२०-२१ या वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल स्विकृत करणे.

८) एक रकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत अनुत्पादित तसेच ज्या कर्जांना व्याजात सुट देण्यात आली याची नोंद व मान्यता घेणे.

९) वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेल्या अनुत्पादित खात्यापैकी वसुलीची शक्यता नाही अशी खाती बँकेचे वसुलीचे सर्व हक्क अबाधित ठेवून निर्लेखित करणे व अशा खात्यावरील नफा तोटा खात्यास न घेतलेले व्याज निर्लेखित करणे व त्यास मंजुरी देणे.

१०) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षणासाठी शासन मान्य नामतालिके मधून आपल्या बँके करिता वैधानिक लेखापालाची नेमणुक रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या परवानगीस अधीन राहून करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

११) सन २०२३-२४ साठी अंतर्गत लेखापरीक्षकांची नेमणुक करण्याचे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास देणे.

१२) आदर्श पोटनियम ११ (ब) नुसार सामान्य (Ordinary) सभासदाने शेअर्स रक्कम पुर्ण भरणे बंधनकारक आहे याबाबत त्यावर चर्चा करणे व त्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे. त्याचप्रमाणे पोटनियमातील तरतुदीनुसार किमान रु. १५००/- चे भाग धारण न केलेल्या सभासदाचे सभासदत्व रद्द करणे व निर्णय घेणे तसेच सभासदांचे क्रियाशील/अक्रियाशील असे वर्गीकरण करणे.

१३) वार्षिक सर्वसाधारण सभेत अनुपस्थित असलेल्या सभासदांची रजा क्षमापित करणे.

१४) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांवर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरून

**स्थळ : पिंपरी** | **दिनांक : ०३/०९/२०२२** | **श्री. सुभाष के. वेळापुरे**

मुख्य कार्यकारी अधिकारी

## * सुचना *

१) ज्या सभासदांना आपला भाग दाखला व गतवर्षीचा लाभांश मिळाला नसेल त्यांनी त्वरीत घेवून जावा, तसेच बँकेत बचत खाते उघडावे म्हणजे लाभांश ताबडतोब जमा होईल. सन २०१८-१९ या कालावधीत उरलेला लाभाशं राखीव निधी वर्ग करण्यात येणार आहे.

२) दि. ३१/०३/२०२२ या वर्षा अखेरचा ताळेबंद व नफातोटा पत्रकाची प्रत बँकेच्या नोंदीणीकृत कार्यालयांमध्ये तसेच सर्व शाखांमध्ये उपलब्ध राहणार आहे. बँकेच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सभासदांना अहवालाची प्रत पाहावयास मिळेल.

३) गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच ठिकाणी सकाळी ११ वाजता घेण्यात येईल. त्यासाठी गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

४) ज्या सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेतील बाबीसंबधी माहिती विचारावयाची असल्यास त्यांनी दि. १२/०९/२०२२ पूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लेखी विचारणा करावी.

५) ज्या सभासदांना राहण्याच्या ठिकाणच्या पत्त्यामध्ये बदल झालेला असल्यास त्याची माहिती बँकेस त्वरित लेखी स्वरुपात कळविण्यात यावी त्यामुळे आपणांस सभेच्या नोटीसा, लाभांश वेळेत मिळू शकेल तसेच सभासदांनी KYC कागदपत्रांची पूर्तता अध्याप केलेली नाही त्यांनी ती ताबडतोब करावी तसेच मोबाईल क्रमांक व ईमेल आणि आईचे नाव हि सर्व माहिती बँकेत कळविणे आवश्यक आहे.

६) सन २०२१-२२ चा ताळेबंद व नफा तोटा पत्रक बँकेच्या www.indrayanibank.com संकेतस्थळावर पाहता येईल.

७) सभासद दिवंगत झाले असतील तर त्यांच्या वारसदारानी याबाबत त्वरित लेखी माहिती योग्य दाखल्यासह बँकेत कळवावी.